# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

### दिनांक २-६-२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

बुधवार दिनांक 2 जून 2010 रोजी मा श्री.विजय वाघमारे भा.प्र.से.,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 10-00 वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से, नगरसचिव,श्री.एम.ए.पठाण यांचे सह संबधीत अधिकारी आणि खालील प्रमाणे स.समिती सभासद उपस्थित होते.

01. स. श्री. सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री. विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री. खान आगा मीयॉ
05. स. श्री. विकास रतनलाल जैन
06. स. श्री. रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री. महेश शिवाजीराव माळवतकर
08. स.श्री. राजू रामराव शिंदे
09. स. सौ. साधना गणेश सुरडकर
10. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
11. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
12. स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
13. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
14. स.श्री. मधुकर दामोधर सांवत
15. स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
16. स.श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**विषय क्र. .1 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 अन्वये स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.

| | |
|---|---|
| नगर सचिव | : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती |
| आणि | इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम |
| 2008 | चे नियम 2 (2) चे तरतूदीप्रमाणे मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचेशी विचार |
| विनिमय | केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्यासाठी स्थायी समिती |
| विशेष | सभेची दिनांक 02/06/2010 वेळ सकाळी 10.00 वाजता निश्चित करण्यात आली |
| | आहे. नियम क्र.4 अन्वये या विषेश बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त |
| किंवा | त्यांचा प्रतिनिधी असेल, जो अतिरिक्त आयुक्तांच्या कमी दर्जाचा नसावा, अशी तरतूद |
| | आहे. |

त्यानुसार मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश जा.क्र. 2010/साप्र/कक्ष-4/नपाप्र/आस्था/कावि-507, दिनांक 26.05.2010 अन्वये स्थायी समितीच्या विशेष सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून काम करण्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना प्राधिकृत केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक 27/05/2010 रोजी स्थायी समिती विशेष बैठकीची सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच निवडणूक घेणे संदर्भात परिपत्रक क्रमांक मनपा/नस/2010/455, दिनांक 27.05.2010 निर्गमित करण्यात आले आहे. व त्यासोबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 ची प्रत तसेच सर्व समित्यांचे सदस्यांची यादी देखिल उपलब्ध करून देण्यात आली आहे.त्यानुसार दिनांक 28/05/2010 ते 01.06.2010 पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व दिनांक 01.06.2010 रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक 01/06/2010 रोजी कार्यालयीन वेळेत स्थायी समिती सभापती पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

1. स. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. स. श्री. शिंदे राजू रामराव
3. स. श्री. शिंदे राजू रामराव
4.. स. श्री. जैन विकास रतनलाल
5.. स.श्री. जैन विकास रतनलाल

आता प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यासाठी मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुर्पुत करीत आहे.

* (नगर सचिव हे स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र छाननीसाठी पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 चे नियम क्र.5 (2) अन्वये सभापती स्थायी समिती पदासाठी आता प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येत आहे.

(पीठासीन अधिकारी नगर सचिव यांच्या मदतीने छाननी करतात)

क्र. 1 वर स.श्री. सावंत मधुकर दामोधर यांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहे त्यावर स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमानखान यांची सुचक तर अनुमोदक म्हणून स. श्री. अमित सुधाकर भुईगळ यांची सही आहे. सुचक व अनुमोदक हे या समितीचे सभासद आहे. हे नामनिर्देश पत्र वैध ठरविण्यात येते.

क्रमांक 2 वर स.श्री.राजू रामराव शिंदे यांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहे त्यावर सुचक म्हणून श्री. माळवतकर महेश शिवाजी तर अनुमोदक म्हणून सौ. साधणा गणेश सुरडकर यांच्या सहया आहे ते या समितीचे सभासद आहे हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येते

क्र.3 वर स.सदस्य श्री. राजू रामराव शिंदे यांचे नामनिर्देशपत्र प्राप्त झालेले आहे त्यावर सुचक म्हणून श्री.माळवतकर महेश शिवाजी तर अनुमोदक म्हणून सौ.

साधना गणेश सुरडकर यांच्या सहया आहे ते या समितीचे सभासद आहे. हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येते.

क्र. 4 वर स.श्री.विकास रतनलाल जैन यांचे नामनिर्देशन पत्र सादर झालेले आहे त्यावर सुचक म्हणून श्री. जायभाये सुर्यकांत सुभानराव व अनुमोदक म्हणून श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण याच्या सहया आहेत या समितीचे सभासद आहे हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येते.

क्र. 5 वर स.श्री. विकास रतनलाल जैन यांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहे त्यावर सुचक म्हणून श्री. श्री. वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत व अनुमोदक म्हणून स. श्री. सिध्द जगदीश कन्हैय्यालाल यांची सही आहे ते या समितीचे सभासद आहे सदरचे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : उमेदवार श्री. विकास रतनलाल जैन यांचे सुचक व अनुमोदक सभागृहात नसल्यामूळे त्यांचा फॉर्म अवैध ठरविण्यात यावा अशी मा. पिठासीन अधिकारी यांना विनंती करीत आहे या बाबत उमेदवार व त्यांचे सुचकही नसल्यामूळे कोणत्या नियमानुसार वैध ठरता येते या बाबत मा. पिठासीन अधिकारी यांनी सांगावे.

मा.पिठासीन अधिकारी : दिनांक 17 फेब्रुवारीचे शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले नियमाचे नियम क्रमांक 3 (2) प्रमाणे प्रत्येक नामनिर्देशन पत्रात उमेदवारांचे पुर्ण नाव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका पालिका सदस्यांने सुचक म्हणून व दुस-यांने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली असेल,सुचक व अनुमोदकांनी उपस्थित रहावे किंवा अनुपस्थित रहावे असे नियमात नमूद केलेले नाही.

स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचे काम पूर्ण झाले असून खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.

1. स.श्री.मधुकर दामोधर सावंत
2. स.श्री.शिंदे राजू रामराव
3. स.श्री.जैन विकास रतनलाल

पिठासीन अधिकारी : छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशनातून उमेदवारास नामनिर्देशनपत्र/ उमेदवारी परत घ्यावयाचे असल्यास त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 चे नियम क्र.5 (3) अन्वये 15 मिनिटांच्या आत उमेदवाराने सही केलेली लेखी सूचना पीठासीन अधिकारी यांना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल. आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे 10-16 वाजले असून 10-31 वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. तसेच नियम क्र.5 (4) अन्वये उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर ती नोटीस रद्द करता येणार नाही.

पीठासीन अधिकारी : आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे.10-31 वाजले असून स्थायी समिती सभापती पदासाठी 03 उमेदवारापैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी स्वतःची सही करून पिठासीन अधिकारी यांना लेखी सूचना देवून आपले नामनिर्देशन/उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

1. स.श्री. मधुकर दामोधर सावंत

स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 चे नियम क्र.6 (2) नुसार प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या मराठी वर्णानुक्रमाने लावण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र. उमेदवाराचे नांव

01. स. श्री. जैन विकास रतनलाल

02. स. श्री. शिंदे राजू रामराव

पीठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती पदाच्या निवडणूका घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 चे नियम क्र.6 (3) प्रमाणे हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल. नगर सचिव यांनी मतदान प्रक्रीया संबंधीची माहिती सभागृहास द्यावी.

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 चे तरतुदी अन्वये सभापती, पदाच्या मतदान प्रक्रीया व निवडी संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

01. नियम 6 (1) अन्वये एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पिठासीन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.

02. नियम 6 (2) अन्वये जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल, तर पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे वर्णानुक्रमे लावतील.

03. नियम क्र.6 (3) अन्वये उमेदवारांचे नांव वर्णानुक्रमाने पुकारण्यात येईल. ज्यांचे नांव पुकारण्यात येईल,त्यांचेसाठी प्रथम हात वर करून मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे, अशा स्थायी समिती सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात नोंदविण्यात येईल.

04. नियम क्र.6 (4) (एक) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पिठासीन अधिकारी देतील.

05. नियम क्र.6 (4) (दोन) अन्वये ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

06. नियम क्र.6 (5) अन्वये ज्या सदस्यांनी मतदान केलेले नाही, त्यांची नोंद देखिल कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

07. नियम 6 (7) अन्वये निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या पीठासीन अधिकारी घोषित करतील व ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील, तो उमेदवार रितसर निवडूण आल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.

8. नियम क्र. 6 (8) अन्वये मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

09. नियम क्र. 6 (9) अन्वये ज्या उमेदवाराच्या नांवाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील.

पीठासीन अधिकारी : आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत.श्री. जैन विकास रतनलाल यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.जैन विकास रतनलाल यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे

सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

(याच वेळी स. श्री. विकास रतनलाल जैन स. श्री.आगा खान मिया हे सभागृहात प्रवेश करतात व अंदाजे 02 मिनिटानंतर इतर काही सदस्यासह ते सभागृहाच्या बाहेर जातात)

पीठासीन अधिकारी : नियम क्र. 6 (4) (एक) अन्वये मत देण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी देण्यात येईल असे म्हटले आहे स.श्री. विकास रतनलाल जैन यांचे बाजूने ज्यांना ज्यांना मतदान करायचे त्यांना आणखी 05 मिनिटाचा अवधी देण्यात येतो (वेळ सकाळी अंदाजे 10-40 वाजता) आता स.श्री.विकास रतनलाल जैन यांचे बाजूने ज्या ज्या सदस्यांना मतदान करायचे 3 मिनिटांचा अवधी शिल्लक आहे.

स.सदस्य श्री.विकास रतनलाल जैन यांना स्थायी समिती सभापती पदासाठी ज्यांना ज्यांना मतदान करायचे होते त्यांना वाजवी संधी देण्यात आली 05 मिनिटाचा अवधी दिलेला होता तो आता संपला आहे

| अ.क्र. | श्री. विकास रतनलाल जैन यांना हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| 1. | स.श्री. जगदीश कैन्हैय्यालाल सिध्द |
| 2. | स. श्री रेणुकादास (राजू )दत्तोपंत वैद्य |
| 3. | स. श्री. जायभाये सुर्यकांत सुभानराव |
| 4. | स. श्री. वाघचौरे विजय लक्षमणराव |

पीठासीन अधिकारी : आता वर्णानुक्रमाने पुढील उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत. श्री.शिंदे राजू रामराव यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.शिंदे राजू रामराव यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | श्री. राजू रामराव शिंदे यांना हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| 1. | स. श्री. अब्दुल साजेद अ.सत्तार |
| 2. | स. श्री सावंत मधुकर दामोधर |
| 3. | स. श्री. शिंदे राजू रामराव |
| 4. | स. सौ. साधना गणेश सुरडकर |
| 5. | स.श्री. माळवतकर महेश शिवाजीराव |
| 6. | स. श्री. जुबेर गाझी असीर अहेमद |
| 7. | स.श्री निमगांवकर प्रल्हाद गणपतराव |
| 8. | स.श्री राठोड प्रमोद प्रल्हाद |
| 9. | स. श्री. भुईगळ अमीत सुधाकरराव |
| 10. | स. श्री. नासेरखॉन अ. रहेमानखॉन |

मा. पिठासीन अधिकारी : एकूण हजर असलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - 16
मतदानात भाग घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - 14

मतदानात भाग न घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या -02

उमेदवारांना मिळालेली मते (मतांच्या संख्येनुसार चढत्या क्रमांकाने उमेदवारांची यादी)

01. श्री. जैन विकास रतनलाल - ( 04 )
02. श्री.शिंदे राजू रामराव - ( 10 )

वरीलप्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी श्री.शिंदे राजू रामराव यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 अन्वये वैध रितीने निवड झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार श्री. राजू रामराव शिंदे यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 अन्वये श्री. राजू रामराव शिंदे यांची बहुमताने निवड झाली या निवडीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**पिठासीन अधिकारी,**
स्थायी समिती विशेष बैठक
महानगरपालिका औरंगाबाद